Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 03 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. सावित्रीबाई फुले यांनी आपलं संपूर्ण जीवन सेवा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनासाठी वाहून घेतलं, असं मोदी यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. सावित्रीबाई फुले या समता, न्याय आणि करुणा या मूल्यांप्रती कटिबद्ध होत्या. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचं सर्वात प्रभावी साधन आहे, असा त्यांचा दृढ विश्वास होता, असं मोदी यांनी नमुद केलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं भगवान बुद्धांशी संबंधित पवित्र पिपरहवा अवशेषांच्या भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उदघाटन करणार आहेत. पिपरहवा अवशेषांचा शोध १८९८ मध्ये लागला आणि प्रारंभीच्या बौद्ध धर्माच्या पुरातत्त्वीय अभ्यासात या अवशेषांना अत्यंत महत्त्वाचं स्थान आहे, असं पंतप्रधान कार्यालयानं प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे.

****

सातारा इथं सुरु असलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा आज दुसरा दिवस.. या संमेलनात आज कथाकथन, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवयित्री अनुराधा पाटील यांचा बालकुमार वाचकांशी संवाद, तसंच अमोल पालेकर यांच्या ऐवज या पुस्तकावर चर्चा होणार आहे. मराठी समाजाची विचारभ्रष्टता मराठी साहित्यात भयकथा, स्त्री चळवळीची ५० वर्षे, अभिजात दर्जा नंतरची मराठी आदी विषयांवर परिसंवाद होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखक, प्रकाशकांचे सत्कार होणार आहेत.

****

मुंबईचा पुढील महापौर महायुतीचाच असेल आणि तो मराठीच असेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल एका मुलाखतीत त्यांनी याबाबत आपली भुमिका स्पष्ट केली. महानगर पालिका निव्हडणुकीत ठाकरे बंधुंची झालेली युती आपल्यासाठी चिंता नसून उलट संधी असल्याचंही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं.

****

नांदेड जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली बालविवाहमुक्त भारत हे शंभर दिवसाचं अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड शहरातील १६ वर्षीय बालिकेचा विवाह थांबवण्यात प्रशासनाला यश आलं. बालिकेच्या पालकांकडून बालविवाह न करण्याबाबत लेखी हमीपत्रही घेण्यात आलं आहे.

****

मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथं स्थिर सर्वेक्षण पथकानं काल एका वाहनातून तीन लाख ५५ हजार रुपयांची रक्कम जप्त केली. ही रक्कम बाळगणाऱ्यांना या पैशांबाबत समाधानकारक स्पष्टीकरण सादर करता आलं नाही, त्यामुळे आदर्श आचारसंहिता भंग प्रकरणी ही रक्कम महापालिकेकडे अधिकृतपणे जमा करण्यात आली आहे.

****

लातूर इथं मनपा आयुक्त मानसी यांनी शहराच्या चारही बाजूंनी स्थापन केलेल्या स्थिर निगराणी पथकासह आचारसंहिता कक्षाला भेट देऊन पाहणी केली. या ठिकाणी तैनात अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना आयुक्त मानसी यांनी आवश्यक सूचना दिल्या.

****

तीर्थक्षेत्र तुळजापुर इथं उमेद मॉल सुरू करण्यात येणार आहे. राज्य सरकारने काल याबाबतचा शासन आदेश जारी केला. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी याबाबत माहिती दिली. उमेद मॉलमुळे जिल्ह्यातील महिला बचत गटांना स्थिर विक्री दालन उपलब्ध होऊन, त्यांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलबध होणार आहे.

****

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर काल एका खासगी बस आणि ट्रकची धडक होऊन बसचालकाचा मृत्यू झाला, तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. छत्रपती

संभाजीनगर जिल्ह्यात लासूर स्टेशन परिसरात हा अपघात झाला. मुंबईहून बुलडाण्याकडे जाणारी बस, उभ्या ट्रकला धडकली व यानंतर बसने पेट घेतला.
या दुर्घटनेत चालकाचा मृत्यू झाला असून जखमींवर छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

****

भारता आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात १९ वर्षाखालील पुरुष क्रिकेट संघात आजपासून तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होत आहे. दक्षिण आफ्रिकेच्या बेनोनी इथल्या विलोमूर पार्क मैदानावर आज पहिल्या सामना होणार आहे. १५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या आयसीसी १९ वर्षाखालील विश्वचषकापुर्वी ही मालिका दोन्ही संघांना तयारीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, आयुष म्हात्रे मनगटाच्या दुखापतीमुळे या मालिकेत खेळू शकणार नाहीत, त्यामुळे वैभव सूर्यवंशी भारतीय संघाचे नेतृत्व  करणार आहे.

****

काल रांची इथं झालेल्या महिला हॉकी इंडिया लीगमध्ये रांची रॉयल्सनं जेएसडब्ल्यू सुरमा हॉकी क्लबचा २-० असा पराभव केला. रांची रॉयल्सकडून ऋतुजा पिसाळ आणि साक्षी राणा यांनी प्रत्येकी एक गोल केला.

****

केंद्रीय आरोग्यमंत्री जेपी यांनी काल राजस्थान आणि महाराष्ट्रच्या आरोग्यमंत्र्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. औषध नियंत्रणे, रुग्ण सुरक्षा, मोफत औषधे आणि निदान सेवा, टेलिमेडिसिन सुविधा, क्षयरोग मुक्त भारत अभियान, तसंच रुग्णालय प्रशासन आणि वैद्यकीय शिक्षण बळकटीकरण यांवर वेगानं काम करण्यासंदर्भात यावेळी आढावा घेण्यात आला.

****

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं, सूर्यप्रकाशयुक्त राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****